नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 14/09/2021 (मंगळवार)
(सकाळ)

---

## चोरी

1) पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत 15 कि. मी. अंतरावरील मौजा व्यंकटेश कोरूगेशन च्या नावाने खैरी गाव सातनवरी फॅक्टरी येथे दिनांक 28/07/2021 चे 11.00 वा. ते दिनांक 13/09/2021 चे 08.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– रमेश अखीलचंद्र टावरी, वय 50 वर्ष, रा. धनलक्ष्मी निवास मोदी नं. 1 सिताबर्डी नागपूर यांचे सन 2016 पासून बंद असलेलया व्यंकटेशन कोरूगेशन कंपनीमधील मशीनचे स्पेअर पार्ट व लोखंडी सामान अंदाजे 3 टन असा एकुण कि. 60,000/– रूपयेचा भंगार माल अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम 457, 545, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री बुंदे मो. नं. 985088198 हे करीत आहे.

2) पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत 2 कि. मी. अंतरावरील आर्शिवाद मंगल कार्यालय कांद्री येथे दिनांक 12/09/2021 चे 23.00 वा. ते दिनांक 13/09/2021 चे 05.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– दर्शन रघुनंदन टिकम, वय 30 वर्ष, रा. कांद्री वार्ड नं. 5 कन्हान याचे मालकिचा एमएच– 40/बीजी– 5259 क्रमांकाचा ट्रक किमत 2 लाख 50 हजार चा अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार खुशाल रामटेके मो नं. 8485861442 हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

पो.स्टे. एमआयडीसी बोरी :– अंतर्गत 2 कि. मी. अंतरावरील साजफुड कंपनी जवळील रोडवर एमआयडीसी बोरी येथे दिनांक 13/09/2021 चे 19:30 वा. ते 20.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– मनोज तुळशीराम कांबळे वय 36 वर्ष रा. फ्रेन्सड कॉलोनी बुटटीबोरी, ता. जि. नागपुर यांचा भाउ नामे– नरेश तुळशीराम कांबळे, वय 42 वर्ष, रा. फ्रेन्सड कॉलोनी बुटटीबोरी, ता. जि. नागपुर हा पायदळ फिर्यादीचे भोजनालयाकडे जात असता साजफुड कंपनी जवळ अज्ञात वाहन चालक आरोपीने आपले वाहन भरधाव वेगाने चालवून पायदळ चालणारे फिर्यादीचे भाउ यास धडक दिली. या अपघातात ते गंभीर जखमी झाल्याने त्यांना माया हॉस्पीटल बुटटीबोरी येथे नेले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास महिला पोलिस उपनिरीक्षक काकडे या करीत आहे.

## जबरी संभोग

पो.स्टे. रामटेक :— दि. 03/09/2021 ते 13.00 वा. ते 14.00 वा. आरोपी नामे— गणेश लक्ष्मण मेंघरे, वय 26 वर्ष, रा. भोजापुर ता. रामटेक याने फिर्यादी यांची 15 वर्षीय पीडित अल्पवयीन मुलगी हिच्या सोबत प्रेमसंबंध ठेवून तिचे अल्पवयाचा फायदा घेत तिचेशी शारीरिक संबंध प्रस्थापीत केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम 376 (3) भादंवि. सहकलम 4 बाल लैंगीक अपराधापासुन संरक्षण कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास महिला पोलिस उपनिरीक्षक बेंद्रे या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर